# GLIMPSES OF PLACMENT









## PAPER NEWS ABOUT PLACEMENTS OF GPND

# कोरोना काळातही २०९ विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

**नांदेड, ता.१** (बातमीदार): एकीकडे कोरोनाने लाखो युवकांच्या नोकऱ्या हिरावल्याचे काही महिण्यापूर्वीपर्यंतचे चित्र असताना दुसरीकडे कोरोना काळात देखील होतकरु व गरजुवंत विद्यार्थ्यांसाठी विविध नामांकित कंपन्यांनी नोकरीची दारे खुली केली आहेत. नांदेडच्या शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयातील अंतिम वर्षाची परिक्षा पूर्ण केलेल्या एक दोन नव्हे, तर २०९ विद्यार्थ्यांना ऑनलाइन मुलाखतीद्वारे नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. शासकीय तंत्रनिकेतन नांदेड या संस्थेअंतर्गत अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे प्राचार्य डॉ.गोरक्ष गर्जे, उपप्राचार्य पी. डी. पोपळे यांनी उपयोजितयंत्रशास्त्र विभागप्रमुख डी. एम. लोकमनवार, यंत्र अभियांत्रिकी विभागप्रमुख आर. एम. सकळकळे, यंत्र अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. एस.चौधरी, विद्युत अभियांत्रिकी विभागप्रमुख व्ही. व्ही. सर्वज्ञ, उत्पादन अभियांत्रिकी विभागप्रमुख एस. एम. कधारे, वैद्यकीय अणूविद्युत विभागप्रमुख बी. व्ही. यादव, माहितीतंत्रज्ञान विभागप्रमुख एस. एन. ढोले, स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख एस. पी. कुलकर्णी व विज्ञान विभागप्रमुख एस. आर. मुधोळकर या सर्वांचे अभिनंदन केले आहे. तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

# शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**नांदेड–** शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमधील सातत्याने निवडीची परंपरा यावर्षी देखील कायम राहिली आहे. कोविड–१९ च्या पार्श्वभूमी असताना–सुद्धा शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये बजाज ऑटो, एल अँड टी, सिग्मा इलेक्ट्रिक, जनरल इलेक्ट्रिक, एन्डयुरन्स, इन्फोसिस आदी प्रसिद्ध कंपन्यांनी ऑनलाईन चाचणी व मुलाखतींचे आयोजन केले. शैक्षणिक वर्षाच्या शेवटी विविध शाखांच्या २२० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यापैकी ४० विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्रे मिळाली असून उर्वरित विद्यार्थ्यांची नियुक्तीपत्रे लवकरच प्राप्त होतील. मागील शैक्षणिक वर्षात देखील संस्थेच्या एकूण २०९ विद्यार्थ्यांना विविध मोठ्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची नियुक्तीपत्रे देण्यात आली होती.

येथील सर्वच शाखेच्या विद्यार्थ्यांची कोअर इंडस्ट्री तसेच सॉफ्टवेअर कंपन्याम ध्ये निवड होत आहे. संस्था निवड करताना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच कॅम्पस प्लेसमेंट हा ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकाचा महत्वाचा निकष असतो. हे लक्षात ठेवून संस्थेचे प्राचार्य डॉ. गोरक्ष गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण व आस्थापना विभाग अधिकारी एस. एम. कंधारे हे परिसर मुलाखतींसाठी अधिकाधिक नामवंत तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांना निमंत्रित करण्यासाठी प्रयत्नशील असतात. नामवंत कंपन्यांकडून संस्थेच्या डिप्लोमाधारक विद्यार्थ्यांना वार्षिक रुपये १.८ ते २.५ लाखापर्यंत पॅकेजची नोकरी देण्यात येत असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा संस्थेत प्रवेश घेण्याकडे कल दिसन येतो. निवड झालेल्या सर्व विद्याथ डॉ. गोरक्ष गर्जे यांनी अभि त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.